# शहराअंतर्गत येणाऱ्या झोपडपट्टीतील गरीब शालेय विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षणात येणाऱ्या अडचणींचा आढावा

**अमिता महातळे**
*समाजशास्त्र विभाग नागपूर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर,*

***गोषवारा***
*ऑनलाईन शिक्षण पद्धती ही कोविड-१९ या संसर्गजन्य साथीचा उद्रेक होण्याच्या अगोदर पासून अस्तित्वात आहे. परंतु ऑनलाईन शिक्षण पद्धतीचा उपयोग केवळ मूठभर लोक करीत असत. YouTube, Facebook, telegram, Chrome, Google meet, इत्यादी सारख्या अनेक साइटवर क्लासेस चालू होते. परंतु त्याचा उपयोग हा सर्व विद्यार्थ्यांना होत नसे. कोविड-१९ या संसर्गजन्य जिवाणूच्या प्रसार रोखण्याकरिता तसेच या महामारीच्या काळात जनतेला संसर्ग होऊ नये म्हणून शासनाने टाळेबंदी तसेच सामाजिक समूहबंदीचा निर्णय घेतला होता. या समूहबंदीचा शिक्षण क्षेत्रावर देखील परिणाम झालेला दिसून येतो.भारतातील पारंपरिक शिक्षणपद्धतीचे रूपांतर ऑनलाइन शिक्षणपद्धतीत करण्यात आले. हा निर्णय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शासनाने घेतला होता. या लघुशोध निबंधात कोविड-१९ या जागतिक महामारी दरम्यान स्वीकारण्यात आलेल्या ऑनलाईन शिक्षणपद्धतीचा आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या विद्यार्थ्यांवर झालेल्या परिणामांचे अध्ययन करण्यात आलेले आहे.*

***शब्दकुंजी :***
*ऑनलाइन वर्ग, टाळेबंदी, संसर्गजन्य रोग.*

**प्रस्तावना** :
कोवीड-१९ला जेव्हा जागतिक महामारी म्हणून घोषित करण्यात आले तेव्हापासून जगातील शैक्षणिक क्षेत्र प्रभावित झाले होते. जे देश विकसित व विकसनशील आहे तसेच ज्या देशाच्या आर्थिक उत्पन्न कमी आहेत अशा देशांवर या महामारीमुळे अधिक गंभीर परिस्थिती ओढवली होती. प्रत्येक राष्ट्राचा विकास हा त्या राष्ट्रातील शिक्षण संस्थेच्या स्वरूपावरून स्पष्ट होत असतो. परंतु शिक्षण क्षेत्रात जागतिकीकरणामुळे स्पर्धा व तणावाचे वातावरण निर्माण झाल्याचे लक्षात येते. ऑनलाईन शिक्षणपद्धतीत महागड्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत असतो. परंतु आर्थिक दृष्ट्या कमकुवत कुटुंबातील विद्यार्थ्यांना मात्र ऑनलाइन शिक्षणपद्धतीचा हवा तसा फायदा होताना दिसून येत नाही. असे विद्यार्थी या ऑनलाइन शिक्षणपद्धतीला बळी पडत असल्याचे निदर्शनात येते. शिक्षणावरील महागडा शुल्क खर्च करून देखील झोपडपट्टीतील मुले शहरी भागातील विद्यार्थ्यांशी स्पर्धा करण्यात अपयशी ठरत आहे.

“शिक्षण ही अध्ययन सुकर करणे किंवा ज्ञान, कौशल्य , मूल्य व विश्वास, सवयीच्या प्राप्तीची प्रक्रिया आहे. अध्यापन प्रशिक्षण कथा सांगणे व संचयित संशोधन याचा शैक्षणिक पद्धतीत समावेश होतो. शिक्षण हे वारंवार शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली होत असते. तथापि विद्यार्थी स्वतःला सुद्धा शिकवू शकतात असे जॉन ड्यूईने त्यांच्या “डेमोक्रसी अँड एज्युकेशन” मध्ये मतव्यक्त केले आहे. वरील व्याख्येवरून असे लक्षात येते की शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास तसेच ज्ञान कौशल्य यांचा विकास होणे आवश्यक आहे. परंतु सध्याच्या तंत्र युगात ऑनलाइन शिक्षणपद्धतीचा शिरकाव झालेला आहे. उदा. दुरुस्थ शिक्षण हे दूरदर्शनच्या माध्यमातून आवश्यक विषयावर व्हिडिओ तयार करून विद्यार्थ्यांना देण्यात येते. या शिक्षण पद्धतीचे सकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही बाजू आहेत. परंतु झोपडपट्टीत वास्तव्यास असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर या पद्धतीचा काय व कसा परिणाम होतो याचा आढावा घेणार आहोत.

**संशोधनाची आवश्यकता**
कोवीड -१९ या जागतिक महामारीच्या काळात अनेक समस्यांची निर्मिती झाली होती. या महामारीचा शिक्षणावर देखील गंभीर परिणाम झालेला दिसून येतो.तसेच विद्यार्थ्यांच्या विकासावर व शैक्षणिक प्रगतीवर ऑनलाईन शिक्षणाचा कसा परिणाम होत होता हे समजून घेण्यासाठी हा लघु लेख लिहिण्यात आलेला आहे.

**उद्देश**
1. झोपडपट्टीतील विद्यार्थ्यांमध्ये ऑनलाईन शिक्षणाविषयी माहिती आहे का हे जाणून घेणे.

2. झोपडपट्टीतील विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण घेत असताना येणाऱ्या अडचणी व समस्या जाणून घेणे .

**अध्ययनपद्धती**

या लघुलेखन कार्य करण्यासाठी द्वितीय स्त्रोत्रांचा वापर करण्यात आलेला आहे. तसेच विषयाशी निगडित असलेले विविध मासिके, पुस्तके, वृत्तपत्रातील लेख तसेच इंटरनेट वरील रिसर्च पेपरचा आधार घेण्यात आलेला आहे.

**झोपडपट्टीतील विद्यार्थी व ऑनलाईन शिक्षणात येणाऱ्या समस्या व अडचणीच्या आढावा**

“ऑनलाइन सूचना” इंटरनेटवर आधारित शिक्षण तसेच संगणक आधारित शिक्षण यासारख्या वेगवेगळ्या नावाने संबोधले जाते.ऑनलाइन शिक्षणाबद्दल Abdul El-Gawad सांगतात की, डिलिव्हरीग अध्यापन इलेक्ट्रॉनिक पद्धतीने वेबद्वारे शिक्षण आणि शिकणाऱ्याचे समर्थन व व्यवस्थापन करण्यासाठी नेटवर्कचा वापर करणे होय. आजचा तरुण वर्ग हा उध्याचे भविष्य आहे.त्यामुळे घराची,समाजाची पर्यायाने राष्ट्राची प्रगती या तरुण वर्गावर निर्भर असते. ऑनलाईन शिक्षणपद्धतीचा उपयोग दुरुस्थ अभ्यासक्रमाचा प्रचार व प्रसार करण्याकरिता करण्यात आला होता. ऑनलाईन शिक्षणपद्धती हे नवीन तरुण युवकांमध्ये प्रचंड लोकप्रिय झालेली आहे. आजकाल या पद्धतीचा उपयोग औपचारिक व अनौपचारीक अशा दोन्ही शिक्षणपद्धतीत केला जातो. ऑनलाइन शिक्षण हे महागडी शिक्षणपद्धती असून याकरिता आधुनिक तंत्रज्ञान युक्त स्मार्टफोन, लॅपटॉप, कम्प्युटर, इंटरनेट कनेक्टिव्हिटी, इंटरनेट पॅकेज, इत्यादीचे आवश्यकता असते. या सर्व गोष्टींची उपलब्धता आर्थिकदृष्ट्या साधन असणाऱ्या पालकांनच्या मुलांना प्राप्त होते .परंतु अशा माध्यमातून शिक्षण घेणे आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या घटकातील विद्यार्थ्या समोर अनेक अडचणीं निर्माण होत असतात.

**तंत्रज्ञानाची अनुपलब्धता**

ऑनलाईन शिक्षण घेण्याकरिता आवश्यक असणारे स्मार्टफोन, टॅब, लॅपटॉप यासारखे महागडे अत्याधुनिक साहित्य आर्थिक अडचणीमुळे आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेले मुल विकत घेऊ शकत नाही. त्यामुळे ऑनलाईन शिक्षण घेणे त्यांना परवडणारे नसते. अशा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे अध्ययनात आले.

**इंटरनेटची कमतरता**

झोपडपट्टीमध्ये इंटरनेटची सेवा असू शकते पण ही सर्वसाधारणपणे कमजोर किंवा अव्यवस्थित असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना घरात wi-fi कनेक्शन उपलब्ध होत नाहीत त्यामुळे ऑनलाईन वर्गामध्ये विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

**स्मार्टफोन किंवा लॅपटॉपची कमतरता**

कुटुंबातील कर्त्या व्यक्तीकडे एकच फोन असल्यामुळे मुलांना ऑनलाईन शिक्षण घेण्याकरिता कुटुंबातील इतर सदस्याना सोबत सहभागी करावे लागते. त्यामुळे शिक्षकांनी शिकवलेले विद्यार्थ्यांना व्यवस्थित समजत नाही.

**शिक्षणाची गुणवत्ता**

विद्यार्थ्यांना आधुनिक स्मार्टफोन तसेच कम्प्युटर या उपकरणाविषय ज्ञानाची कमतरता असल्यामुळे तसेच इंटरनेट सिस्टीम न चालणे व उपकरणाच्या कमतरतेमुळे मुलांना शालेय शिक्षकांकडून शिकविणीचा दर्जा आणि लक्ष देण्याची क्षमता कमी पडत असल्याचे निदर्शनात येते.

**पर्याप्त अभ्यास साहित्याची कमतरता**

ऑनलाईन शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना न समजलेल्या भागावर किंवा अभ्यासास उपयुक्त असणाऱ्या विषयाशी संबंधित योग्य पुस्तके नोट्स आणि इतर शालेय सामग्री मिळणे कठीण होते.

**प्रेरणेचा अभाव**

झोपडपट्टीतील वातावरण हे शिक्षणास योग्य नसते अशा घरातील वातावरण हे ऑनलाईन शिक्षण घेण्याकरिता अयोग्य असते. तसेच कुटुंबातील पालकांना शिक्षण शिक्षणात आवड नसल्याने विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याकरिता पोषक वातावरण निर्मिती होत नाही. विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याकरिता आवश्यक असणाऱ्या पोषक वातावरण तसेच प्रेरणेचा अभाव असतो.

**शांतीचे वातावरण नाही**

ऑनलाईन शिक्षण घेण्याकरिता आवश्यक असणारे योग्य वातावरण झोपडपट्टीत प्राप्त होत नाही. सर्व बाजूला भांडणे, जोरजोरात बोलणे, असल्याकारणाने शिक्षण घेण्याकरिता आवश्यक असणारे शांतीचे वातावरण उपलब्ध होत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे अध्ययनात लक्ष लागत नाही.

**शिक्षकांचा संपर्क कमी असणे**

ऑनलाइन शिक्षण घेत असताना शिक्षक व विद्यार्थी यांच्यात असणारे समोरासमोरील संवाद कमी होतो त्यामुळे त्यांच्यातील भावनिक दरी वाढत जाते त्यामुळे विद्यार्थ्यांना परंपरागत शिक्षणपद्धतीत असणारे शालेय वातावरण व मित्रपरिवार मिळत नसल्या कारणामुळे एकटेपणाची भावना निर्माण होते.

**एकाग्रतेची कमतरता**

विद्यार्थी झोपडपट्टीत वास्तव्य करीत असल्याने शिक्षणास पोषक असणारे वातावरण निर्मिती होत नाही. घरातील वातावरण शिक्षणासाठी योग्य राहत नाही. ऑनलाइन क्लास सुरू असताना कुटुंबातील इतर सदस्यांची उपस्थिती तसेच अभ्यासाकरिता आवश्यक असणाऱ्या साहित्य प्राप्त करून घेण्याकरिता आवश्यक असणाऱ्या वाचनालयाची अनुपस्थिती यामुळे विद्यार्थ्यांचे मनोबल कमी होत जाते व त्यामुळे त्याचे अभ्यासातील एकाग्रता कमी होते.

**समारोप**

ऑनलाइन शिक्षण घेणे हे आजच्या काळाची गरज असली तरी हे शिक्षण घेण्याकरिता आवश्यक असणारे साहित्य हे अत्यंत महाग असल्यामुळे आर्थिक दृष्ट्या कमकुवत असणाऱ्या विद्यार्थ्यांना परवडणारी नसून यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होताना दिसून येते

**संदर्भ ग्रंथ**

- Alaul Alam (3june2020) “challenges and possibilities of online education during Covid-19”, online publication (8:25:46CEJT)
- Pujari D.R.(2020) “impact of corona virus on Indian education system”. UGC care general 31.
- Mustafa N.(2020) “Impact of the corona virus pandemic on education”. International Journal of health reference research.1-12.
- Shahu P.(2020) “challenges of University due to corona virus disease 2019(Covid -19): impact on education and mental health of students and academicstaff”.cureus,12,e7541.https://doi.org/10.7759/cureus.7541
- “करोना विषाणू आणि शिक्षण” Maharashtra Times/update12 April 2020,04:00:00AM
- कुंडू प्रतिभा (२०२०) “डिजिटल शिक्षण आणि विद्यार्थ्यांची मानसिक आरोग्य”. जून २२,२०२० द वायर मराठी.कॉम
- कुंवर राजीव कुमार “संकट की घडी मे ऑनलाइन शिक्षा सही है पर इसे कक्षा हो का विकल्प नही बनाया जा सकता”,08/01AM May17,2020m. thewirehindi.com